# डोंगराळ भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय होण्यासाठी या शिक्षण संस्थेची स्थापना: माजी आमदार सुरेशराव हळवणकर

## इयत्ता दहावी व बारावी मधील गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभ




गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभ प्रसंगी मार्गदर्शन करताना माजी आमदार सुरेशराव हळवणकर समवेत डॉ.विजयकुमार पाटील, नाथाजी पाटील, डॉ. के. एस. चौगुले, हिंदुराव शेळके, अरुण इंगवले, सौ. कल्पनाताई चौगुले

डॉ.के.एस.चौगुले यांनी पन्हाळा तालुक्याच्या पश्चिमेकडील डोंगराळ भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय होण्यासाठी या शिक्षण संस्थेची स्थापना केली आहे.आज या संस्थेमार्फत अनेक विभाग सुरू करून ते चांगल्या पद्धतीने चालवले जात आहेत हा ग्रामीण भागातील विद्यार्थी अभ्यासू ,हुशार,होतकरू आहे.या विद्यार्थ्यांनी आपल्या विद्वत्तेच्या जोरावर या महाविद्यालयाचे नाव राज्य व देश पातळीवर उज्वल करावे व आपले भविष्यकालीन जीवन आनंदी बनवावे असे प्रतिपादन भारतीय जनता पार्टीचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष व माजी आमदार सुरेशराव हळवणकर यांनी केले.

श्रीपतराव चौगुले आर्टस् ॲण्ड सायन्स कॉलेज ,माळवाडी-कोतोली येथील ज्युनिअर विभाग व माध्यमिक विद्यालय,माळवाडीच्या इयत्ता दहावी व बारावी मधील गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभ प्रसंगी मार्गदर्शन करताना माजी आमदार सुरेशराव हळवणकर बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्ञानगंगा शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक- अध्यक्ष व कोल्हापूर जिल्हा परिषदेच्या बांधकाम व आरोग्य समितीचे माजी सभापती डॉ. के. एस. चौगुले होते.

कार्यक्रमाचे उद्घाटन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून करण्यात आले.

यावेळी इयत्ता दहावी व इयत्ता बारावी परीक्षेमधील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळाचे माजी अध्यक्ष हिंदुराव शेळके ,भारतीय जनता पार्टी कोल्हापूर जिल्हा ग्रामीणचे अध्यक्ष नाथाजी पाटील तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष व संस्थेचे संस्थापक-अध्यक्ष डॉ. के. एस. चौगुले यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळाचे माजी अध्यक्ष हिंदुराव शेळके , भारतीय जनता पार्टी कोल्हापूर जिल्हा ग्रामीणचे अध्यक्ष नाथाजी पाटील,कोल्हापूर जिल्हा परिषदेचे माजी सदस्य अरुण इंगवले होते.

कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून ज्ञानगंगा शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष प्रा.जी.टी.पाटील ,सचिव शिवाजीराव पाटील,माजी प्राचार्य डॉ.जे.के.पवार ,संचालक डॉ.अजय चौगुले ,कोल्हापूर जिल्हा परिषदेच्या माजी सदस्य व संस्था संचालक सौ. कल्पनाताई चौगुले,संचालक प्रकाश भीमराव पाटील ,खजानिस मारुती श्रीपती चौगुले ,संचालक प्रा.वेदिका विजय चौगुले ,संचालक विजय केरबा चौगुले,प्राचार्य डॉ. विजयकुमार पाटील होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत ज्युनिअर विभाग प्रमुख व सिनेट सदस्य डॉ.उषा पवार यांनी केले पाहुण्यांची ओळख मानसिंग पाटील यांनी करून दिली आभार मुख्याध्यापिका टी.के.पाटील यांनी मानले तर सूत्रसंचालन प्रा.रवींद्र चौगुले यांनी केले.

कार्यक्रमाचे संयोजन ज्युनिअर विभाग प्रमुख व सिनेट सदस्य डॉ. उषा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा.संजीव कुंभार,प्रा.आर.बी. पाटील, प्रा. सीमा पाटील, प्रा.दत्तात्रय धडेल, प्रा.प्रकाश लव्हटे, प्रा.प्रतिभा पाटील, प्रा.उत्तम पवार, प्रा.स्मिता कुंभार, प्रा.शरदचंद्रिका लिगाडे, प्रा.वर्षा पाटील, प्रा.सुजाता पाटील, प्रा.सुधीर पाटील, प्रा.रवींद्र चौगुले यांनी केले.

कार्यक्रमास सी. डी. सी. सदस्य सागर वरपे, शहाजी कुदळे, पत्रकार शिवाजी पाटील, पत्रकार विक्रम पाटील, पत्रकार पांडुरंग फिरंगे, पत्रकार सुरेश पाटील, पालक, शिक्षक,

प्रशासकीय कर्मचारी,विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते.